# दि ठाणे डिस्ट्रिक्ट को. ऑप. हौसिंग फेडरेशन लि.

यांच्या वतीने

खास महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी

# सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन अभ्यासक्रम

## Co-Operative Housing Society Management Course



## भविष्य घडवायचयं?

तर आजच सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन अभ्यासक्रमामध्ये सहभागी व्हा!

# दि ठाणे डिस्ट्रिक्ट को.ऑप. हौसिंग फेडरेशन लि.

## आमच्या संस्थेबद्दल माहिती:

दि ठाणे डिस्ट्रिक्ट को-ऑप. हौसिंग फेडरेशन ही सहकारी गृहनिर्माण संस्थांची एकमेव जिल्हास्तरीय संघीय संस्था आहे. आजमितीस ठाणे जिल्हयातील १६००० गृहनिर्माण संस्था फेडरेशनच्या सदस्य आहेत. गृहनिर्माण संस्थांना शिक्षण, प्रशिक्षण यासाठी मार्गदर्शन करण्याचे काम फेडरेशन करते.

दि ठाणे डिस्ट्रिक्ट को-ऑप. हौसिंग फेडरेशनने सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन अभ्यासक्रम सुरु केला असून, त्याला सहकार विभागाच्या जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे यांनी मंजुरी दिलेली आहे. गृहनिर्माण संस्थांनी जिल्हा फेडरेशनच्या नामतालिकेमधूनच प्रशिक्षित व्यवस्थापकाची नियुक्ती करणे शासनाने अनिवार्य केले आहे.

गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन अभ्यासक्रम हा १३ (FY) व १४ (SY) वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असून शिकता शिकता नोकरी या उद्देशाप्रमाणे विद्यार्थ्यांना शिक्षण घेतानाच नोकरीची संधी उपलब्ध करुन दिली जाणार आहे. त्याचबरोबर या अभ्यासक्रमाच्या फीचा खर्च त्यांच्या पालकांवर न टाकता विद्यार्थ्यांनी शिकता शिकता नोकरी करुन करावा अशी संकल्पना आहे.

या अभ्यासक्रमात एकूण ५ विषय आहेत. सदर अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना गृहनिर्माण संस्थामध्ये व्यवस्थापक म्हणून काम करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. ही महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना **सुवर्ण संधी** आहे.

## अध्यक्षांचा संदेश:

मी तुम्हाला खात्री देतो की, सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन अभ्यासक्रमाच्या माध्यमातून दि ठाणे डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह हौसिंग फेडरेशन आणि आपल्या महाविद्यालयाचे प्राचार्य / प्राध्यापक मिळून एकत्रितपणे तुमच्या करिअरच्या वाढीला गती देण्याचे प्रयत्न करु.
या संधीचा जास्तीत जास्त फायदा घेऊन यशाकडे जाण्याचा प्रयत्न करा.
त्यासाठी माझ्याकडून शुभेच्छा !



**श्री. सिताराम राणे**

अध्यक्ष, दि ठाणे डिस्ट्रिक्ट को-ऑप. हौ. फेडरेशन लि. ठाणे

## गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन अभ्यासक्रमाचा फायदा:

- सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये पूर्णवेळ/अर्धवेळ व्यवस्थापक म्हणून कामकाज करण्याची संधी.
- सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये पदाधिकारी, सल्लागार, लेखापाल, व्यवस्थापन समितीमध्ये सदस्य, तज्ज्ञ संचालक, म्हणून काम करण्याची संधी.
- दि ठाणे डिस्ट्रिक्ट को. ऑप. हौसिंग फेडरेशनने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी व्यवस्थापक म्हणून शिकता-शिकता नोकरी मिळविण्याची सुवर्ण संधी उपलब्ध करुन दिली आहे.
- भविष्यामध्ये जी. डी. सी. ॲन्ड ए. व सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन अभ्यासक्रमात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना सहकार विभागाकडून गृहनिर्माण संस्थांचा निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम करण्याची संधी.
- सहकारी गृहनिर्माण संस्थामध्ये व्यवस्थापक म्हणून नोकरीची संधी.

# दि ठाणे डिस्ट्रिक्ट को.ऑप. हौसिंग फेडरेशन लि.

## नोकरीची संधी:

महाविद्यालयामधील दि ठाणे डिस्ट्रिक्ट को - ऑप. हौसिंग फेडरेशनतर्फे "सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन अभ्यासक्रम" पूर्ण करणारे व प्रमाणपत्र धारण करणारे सर्व विद्यार्थी व्यवस्थापक नामतालीकेत समाविष्ट केले जातील आणि त्यांच्या रहिवासी पत्याप्रमाणे जवळपास असणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये व्यवस्थापकासाठी त्यांचे नाव सूचित केले जाईल. अशाप्रकारे त्यांच्या नोकरीची हमी देता येईल.

## शैक्षणिक कर्ज सवलत योजना:



सदरहू कोर्ससाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी व पालकांवर जास्त आर्थिक बोजा पडु नये या हेतूने दि ठाणे डिस्ट्रिक्ट को-ऑप. हौसिंग फेडरेशनने सहकारी बँके बरोबर सामंजस्य करार करुन प्रत्येक विद्यार्थ्यास सहकारी बँकेव्दारे कर्ज उपलब्ध करुन दिले आहे. याचे वर्गीकरण "शैक्षणिक कर्ज" असे असणार आहे. विद्यार्थ्यांनी हौसिंग मॅनेजमेंटचा कोर्स उत्तीर्ण केल्यानंतर घेतलेल्या कर्जाची बँकेबरोबर झालेल्या कराराप्रमाणे परतफेड करण्याचे आहे.

सध्या चालू परिस्थितीमध्ये पूर्णवेळ काम करणारे मॅनजर्सचे मासिक वेतन साधारपणे रुपये **३५,०००/- ते ४०,०००/-** इतके आहे.

## परीक्षा:

* प्रत्येक विषयाची १०० मार्काची दोन तासांची (१२० मिनिटे) लेखी परीक्षा असेल.
* पेपर ऑब्जेक्टिव्ह व डिस्क्रिप्टीव्ह स्वरुपाचा असेल.

## अभ्यासक्रम विषय:

* गृहनिर्माण संस्था इतिहास, व्याख्या व व्याप्ती.
* गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन.
* गृहनिर्माण संस्था हिशोब लेखन पध्दती व तपासणी.
* गृहनिर्माण संस्था कायदा व इतर निगडीत कायदे.
* गृहनिर्माण संस्था व्यवस्थापकाची भूमिका.

## प्रमाण पत्र:

प्रत्येक उत्तीर्ण विद्यार्थ्याला शासनाच्या सहकार विभाग व दि ठाणे डिस्ट्रिक्ट को - ऑप. हौसिंग फेडरेशन यांच्या संयुक्त प्रमाणपत्र देण्यात येईल.

## उत्तीर्ण होण्याच्या अटी:

* प्रत्येक विषयात किमान ४०% मार्कस्
* किमान ६५% क्लासमध्ये उपस्थिती
* व्हायवा (Viva)/तोंडी परीक्षा(Oral)/प्रॅक्टिकल मध्ये सहभाग बंधनकारक.

## प्रवेश शुल्क:

* सर्वसाधारण अभ्यासक्रमासाठी रु. १२५००/- + GST.
* महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी प्रवेश सवलतीच्या दरात रु. १००००/- + GST.

वि.सु. - १. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कर्ज योजने अंतर्गत सहकारी बँकेतून शैक्षणिक कर्ज उपलब्ध करुन दिले जाईल. त्याचा व्याजदर बँकेच्या नियमाप्रमाणे असेल.

२. कर्जाची परतफेड व्याजासहीत अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर करावी लागेल.

३. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर प्रशिक्षणार्थी व्यावस्थापक म्हणून काम करण्याची संधी उपलब्ध करुन दिली जाईल.

४. अभ्यासक्रम पूर्ण करुन व प्रशिक्षणाचा कालावधी पूर्ण केल्यानंतर व्यवस्थापक म्हणून फेडरेशनच्या पॅनेलवर नाव समाविष्ट केले जाईल.

# दि ठाणे डिस्ट्रिक्ट को.ऑप. हौसिंग फेडरेशन लि.

**इतर:**

* ३२ पूर्ण सत्र (Session) (पाऊस/वाहतुक व्यवस्था कोलमडणे / नैसर्गिक आपत्ती ह्या सारख्या कारणांमुळे एखादा वर्ग होऊ शकला नाही तर तो Adjust करुन पूर्ण करण्यात येईल.)
* वर्ग मराठी/इंग्रजी असे संमिश्र स्वरुपामध्ये असतील व विद्यार्थी इंग्रजी अथवा मराठी माध्यमातून परिक्षा देऊ शकतील.
* अभ्यासक्रमात उत्तीर्ण होणारे विद्यार्थी फेडरेशनच्या नामतालिकेवर असणार आहेत तेव्हा विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम गंभीरतेने घेणे गरजेचे आहे.
* सदर अभ्यासक्रम हा शनिवार, रविवार या सुट्टीच्या दिवशी घेतला जाईल.

**सूचना: प्रवेशासाठी आपल्या महाविद्यालय व्यवस्थापकांशी किंवा दि ठाणे डिस्ट्रिक्ट को.ऑप. हौसिंग फेडरेशनशी संपर्क साधावा.**










## संस्थेचा पत्ता

१०१-१०३, विलासिनी बिल्डींग, शिवाजी पथ, ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकसमोर, ठाणे (प.) - ४००६०१.

## प्रशिक्षण केंद्र पत्ता

एस-०२, पूर्णशांती हाइट्स्, खारटन रोड, खंडोबा मंदिराजवळ, ठाणे (प.)-४००६०१.

संपर्क क्र. : + ९१ ९३२०३३२२८६/९३२३३३२२८६

ईमेल:- thanedisthsgfed75@gmail.com


*T&C Apply